# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## ( परीक्षा व मुल्यमापन मंडळ)


एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४


जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/1888./२०२१ दि. 30/०६/२०२१

## परिपत्रक

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील सर्व प्राचार्य, पदव्युत्तर विभागांचे विभागप्रमुख व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२०–२१ मध्ये विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेले परीक्षा शुल्क व इतर शैक्षणिक शुल्क सरसकट परत करण्याबाबत विद्यार्थी, विविध विद्यार्थी संघटना, शिक्षक संघटना आणि मा. लोप्रतिनिधीकडून वारंवार विद्यापीठाकडे मागणी होत असल्याने ही बाब दि. २६ जून,२०२१ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परीषदेच्या सभेमध्ये विचारार्थ ठेवण्यात आली व त्या अनुषंगाने चर्चा करण्यात येऊन "कोविड–१९ साथरोगाच्या प्रादुर्भावाची परिस्थिती लक्षात घेता उन्हाळी–२०२१ परिक्षेच्या परीक्षा शुल्कात विद्यापीठातील सर्व नियमित विद्यार्थ्यांना सरसकट १० टक्के कपात करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला."

"तसेच शैक्षणिक सत्र २०२१–२२ करिता इंद्रधनुष्य, आव्हान, आविष्कार, विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी वैद्यकिय मदत शुल्क, विद्यार्थी संघ शुल्क, वैद्यकीय तपासणी अर्ज शुल्क, आपत्ती व्यवस्थापन शुल्क १०० टक्के तसेच प्रयोगशाळा शुल्क, ग्रंथालय शुल्क, पर्यावरण शुल्क ५० टक्के माफ करण्यात येत आहे."करिता याची सर्व संबधीतांनी नोंद घेवून पुढिल आवश्यक कार्यवाही घ्यावी.

30/6/2021

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२. मा. प्र–कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५. मा. अधिष्ठाता सर्व विद्याशाखा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
६. मा. सचांलक, क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
७. सर्व विभागप्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
८. सर्व उपकुलसचिव तथा सहायक कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली